Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 13 February 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १३ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

जागतिक रेडिओ दिवस आज साजरा केला जात आहे. रेडिओच्या महत्त्वाबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणं आणि रेडिओद्वारे माहिती मिळवण्याकरता प्रोत्साहन देण्यासाठी, दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. 'रेडिओ आणि हवामान बदल' ही यंदाच्या जागतिक रेडिओ दिनाची संकल्पना आहे.

रेडिओ म्हणजे संवादाचं टिकाऊ, बहुमुखी आणि सर्वत्र सहज उपलब्ध होणारं माध्यम असून, त्याचं हे महत्व साजरं करण्याची संधी, म्हणजे जागतिक रेडिओ दिन असल्याचं युनेस्कोच्या महासंचालक ऑड्रे अझोले यांनी म्हटलं आहे. सध्या वेगानं बदलणाऱ्या जगात हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यासाठी आणि त्याच्याशी जुळवून घेण्यासाठी रेडिओ अनेकविध मार्गांनी काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रेडिओ दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहे. रेडिओ हे सर्जनशीलतेचा उत्सव साजरं करणारं एक शक्तिशाली माध्यम असल्याचं, त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

बहुजन हिताय, बहुजन सुखाय, या ब्रिदवाक्यासह जगातलं सर्वात मोठं रेडिओ जाळं असलेलं आकाशवाणी, हे देशातल्या सगळ्या लोकांपर्यंत पोहोचणारं माध्यम आहे, बातम्या आणि माहितीच्या प्रसाराद्वारे राष्ट्राच्या सांस्कृतिक, आर्थिक विकासात रेडिओची महत्वाची भुमिका असल्याचं, प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सेहगल यांनी म्हटलं आहे.

नऊ दशकांपासून आकाशवाणी माहिती, मनोरंजन आणि शिक्षणासह श्रोत्यांपर्यंत पोहोचत आहे, असं आकाशवाणीच्या महासंचालक डॉ. प्रज्ञा पालिवाल गौर यांनी म्हटलं आहे.

****

लोकसभेत आज आयकर विधेयक २०२५ सादर केलं जाणार आहे. आयकराशी संबंधित कायद्यांचं एकत्रिकरण आणि काही सुधारणा करण्याच्या उद्देशानं बनवलेलं हे विधेयक सभागृहाच्या आजच्या कामकाजात ठेवलं जाईल. वक्फ सुधारणा विधेयकासंबंधी नेमण्यात आलेल्या संयुक्त संसदीय समितीचा अहवालही आज संसदेच्या दोन्ही सभागृहात मांडला जाणार आहे.

****

खाद्यपदार्थांच्या किंमती घसरल्याने जानेवारी महिन्यात किरकोळ चलनफुगवट्याचा दर ४ पूर्णांक ३१ शतांशांवर आला आहे. केंद्रीय सांख्यिकी कार्यालयानं ही आकडेवारी प्रसिद्ध केली. गेल्या पाच महिन्यातला हा नीचांक आहे. गेल्या वर्षीच्या जानेवारीत हा दर पाच पूर्णांक एक दशांश टक्के होता.

****

भारतीय रिझर्व बँक लवकरच ५० रुपये मूल्याच्या नवीन नोटा जारी करणार आहे. या नोटांवर नवनियुक्त गव्हर्नर संजय मल्होत्रा यांची सही असेल. महात्मा गांधी मालिकेतल्या यापूर्वीच्या नोटांप्रमाणेच या नोटा असतील असं रिझर्व बँकेच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

****

प्रख्यात गायक पंडित प्रभाकर कारेकर यांचं काल मुंबईत वृद्धापकाळाने निधन झालं, ते ८० वर्षांचे होते. दादर इथं आज संध्याकाळी त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार होणार आहेत. शास्त्रीय आणि मराठी वाट्यसंगीतातला धारदार आवाज, ही त्यांची ओळख होती. तानसेन सन्मान तसंच संगीत नाटक अकादमी पुरस्कारानं त्यांना गौरवण्यात आलं होतं.

****

पुणे फिल्म फाउंडेशन, राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, आणि मुंबईच्या दादासाहेब फाळके चित्रनगरी यांच्याद्वारे 'शो मॅन : राज कपूर' या मध्यवर्ती संकल्पनेवर तेविसावा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आजपासून पुण्यात सुरु होत आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतल्या योगदानाबद्दल अभिनेत्री शुभा खोटे आणि अभिनेते अनुपम खेर, गायिका कविता कृष्णमूर्ती यांना यंदाच्या महोत्सवात पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. विविध देशी-विदेशी सुमारे १५० चित्रपट, जागतिक स्पर्धा विभागातले १४ आणि मराठी स्पर्धा विभागातले सात चित्रपट या महोत्सवात दाखवले जाणार आहेत.

****

मोबाइलवर येणारे अनावश्यक कॉल किंवा एसएमएसची तक्रार ग्राहकांना आता तीन दिवसांऐवजी सात दिवसापर्यंत करता येणार आहे. ग्राहकानं कॉल किंवा एसएमएस पाठवणारा क्रमांक, याविषयी थोडक्यात माहिती, तारिख यासारखी माहिती दिली तर मोबाइल कंपन्यांना ही तक्रार ग्राह्य धरावी लागेल. आवश्यकता असेल तर या कंपन्यांनी ग्राहकांना अधिक माहिती विचारावी, असं भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण – ट्रायनं स्पष्ट केलं आहे.

****

कोल्हापूर इथं कळंबा तलाव परिसरात असलेल्या श्रद्धा हॉस्पिटलमधल्या अवैध गर्भलिंग निदान आणि गर्भपात करणाऱ्या रॅकेटचा जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने पर्दाफाश केला. गर्भलिंग निदान करणाऱ्या महिला डॉक्टरसह गर्भपाताच्या गोळ्यांची विक्री करणाऱ्या दोन महिलांना करवीर इथून ताब्यात घेण्यात आलं.

****

भामरागड इथल्या जंगलात नक्षल्यांशी लढताना हुतात्मा झालेले पोलीस अंमलदार महेश नागुलवार यांच्या पार्थिवावर काल अनखोडा इथं शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. गडचिरोलीच्या पोलीस मुख्यालयाच्या पटांगणावर हवेत बंदुकीच्या फैरी झाडून नागुलवार यांना मानवंदना देण्यात आली. त्यांच्या शौर्याची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कुटुंबीयांना दोन कोटी रुपयांचं आर्थिक सहाय्य आणि विविध लाभ देण्याची घोषणा केली.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ज्येष्ठ नेते राजन साळवी यांनी पक्षाच्या उपनेतेपदाचा राजीनामा दिला आहे. रत्नागिरी जिल्ह्यातल्या राजापूर विधानसभा मतदारसंघात झालेल्या पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारून आपण उपनेतेपदाचा राजीनामा देत असल्याचं त्यांनी या संदर्भातल्या पत्रात लिहिलं आहे.

****